महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्रशासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत, तळमजला, प्लॉटनं.१, धारावी रोड, माटुंगा, मुंबई-४०००१९.
email : managerbcrrc1@gmail.com
दुरध्वनी क्रमांक:०२२-२४०१३५०५
website : www.mahadiscom.in
फॅक्स क्रमांक:०२२-२४०२५७६३

क्र. मासंवि/मावक/ 15482 दिनांक: 07/07/2021

प्रति,
मुख्य अभियंता,
म.रा.वि.वि.कं.मर्या.,
अमरावती/अकोला/औरंगाबाद/भांडुप/बारामती/जळगांव/
चंद्रपूर/गोंदिया/कल्याण/कोल्हापूर/लातूर/नागपूर/नांदेड/
नाशिक/पुणे/रत्नागिरी.

**विषय :** कनिष्ठ सहाय्यक (लेखा) यांचे निम्नस्तर लिपीक (लेखा) या पदावर समायोजन करणेबाबत.

**संदर्भ :** पत्र क्र. मासं/कनिष्ठ सहाय्यक/समावेशन/७६१८ दि. २३/१०/२०२०.

---

१. उपरोक्त विषयानुसार कनिष्ट सहाय्यक (लेखा) या पदावर कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांचे कंत्राटी कालावधी पूर्ण झाल्यानंतर त्यांना निम्नस्तर लिपीक (लेखा) या पदावर समायोजन करणेबाबत विविध परिमंडळ कार्यालये तसेच कनिष्ठ सहाय्यक (लेखा) या पदावर कार्यरत असलेले कर्मचारी यांची निवेदने या कार्यालयास प्राप्त झाली आहेत.

२. म.रा.वि.वि.कंपनीचे वर्गीकरण व सेवाप्रवेश विनियम-२००५ चे सुधारपत्र क्र. ६२ दि. ०३/०९/२०१५ अन्वयें निम्नस्तर लिपीक (लेखा) ही पदे भरताना प्रथम उमेदवारांना/अवलंबितांना निम्नस्तर लिपीक (लेखा) या पदाच्या अनुशेष व रिक्त पदांच्या उपलब्धतेनुसार ३ वर्ष कंत्राटी पदधतीवर कनिष्ठ सहाय्यक (लेखा) या पदावर नियुक्ती केली जाते. सदर ३ वर्षांचा कालावधी समाधानकारकरीत्या पूर्ण केल्यानंतर त्यांना निम्नस्तर लिपीक (लेखा) या नियमित पदावर सामावून घेतले जाते.

३. त्याअनुषंगाने सध्या कार्यरत असलेल्या कनिष्ठ सहाय्यक (लेखा). यांना त्यांच्या नियुक्तीच्यावेळी संबंधित कार्यालयाकडे उपलब्ध असलेल्या अनुशेष व रिक्त पदांच्या उपलब्धतेनुसारच नियुक्ती देण्यात आलेली आहे. तसेच काही कनिष्ठ सहाय्यक (लेखा) यांची बदलीदेखील निम्नस्तर लिपीक (लेखा) या पदाचा संबंधित कार्यालयाकडे अनुशेष व रिक्त पदांच्या उपलब्धतेनुसारच करण्यात आलेली आहे.

४. म.रा.वि.वि.कंपनीचे वर्गीकरण व सेवाप्रवेश विनियम-२००५ चे सुधारपत्र क्र. ५० दि. १७/०९/२०१२ अन्वये निम्नस्तर लिपीक (लेखा) ही पदे १००% सरळसेवेनें भरली जात होती. तदनंतर सुधारपत्र क्र. ८६ दि. १८/०९/२०२० अन्वये निम्नस्तर लिपीक (लेखा) पदाच्या भरतीसाठी सरळसेवा ७५%, अंतर्गत अधिसूचना १५% आणि पदोन्नती १०% याप्रमाणे पदांची विगतवारी करण्यात आलेली आहे.

५. सुधारपत्र क्र. ८६ दि. १८/०९/२०२० नुसार निम्नस्तर लिपीक (लेखा) पदाच्या भरतीसाठी विगतवारी केल्यानंतर असे निदर्शनास आले आहे की, सदर सुधारपत्र निर्गमित होण्यापूर्वी सरळसेवेच्या १००% कोटयाअंतर्गत 'कनिष्ठ सहाय्यक (लेखा)' या पदांवर नियुक्ती देण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना आता सुधारपत्र क्र. ८६ दि. १८/०९/२०२० मधील तरतुदीनुसार निम्नस्तर लिपीक (लेखा) पदाच्या सरळसेवेच्या ७५% कोटयाअंतर्गत सामावून घेणेसाठी पदे उपलब्ध होत नाही.

६. कनिष्ठ सहाय्यक (लेखा) या पदावर कार्यरत ज्या कर्मचाऱ्यांचा तीन वर्षांचा कंत्राटी कालावधी पूर्ण झाला आहे अशा कर्मचाऱ्यांना ते कंपनीमध्ये रुजू होत असताना संबंधित कार्यालयाकडील निम्नस्तर लिपीक (लेखा) या पदाचा अनुशेष व रिक्त पदांवर सामावून घेणे आवश्यक आहे.

७. त्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, आपल्या कार्यालयांतर्गत कनिष्ठ सहाय्यक (लेखा) या पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना निम्नस्तर लिपीक (लेखा) या नियमित पदावर सामावून घेण्याच्या दृष्टीकोनातून खालीलप्रमाणे सूचना पारित करण्यात येत आहेत.

i) म.रा.वि.वि.कं.मर्या., वर्गीकरण व सेवाप्रवेश विनियम-२००५ चे सुधारपत्र क्र. ८६ दि. १८/०९/२०२० निर्गमित होण्यापूर्वी सदर मंडल कार्यालयाकडील **निम्नस्तर लिपीक (लेखा) पदाचा अनुशेष व रिक्त पदे यांचा विचार करुन** त्या मंडल कार्यालयाकडे ज्या कनिष्ठ सहाय्यक (लेखा) यांना नियुक्ती देण्यात आली आहे, अशा कार्यरत कनिष्ठ सहाय्यक (लेखा) यांना निम्नस्तर लिपीक (लेखा) या रिक्त पदावर कार्यरत आहेत असे गृहीत धरुन त्यांचा ३ वर्षांचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर त्यांना प्रकरणपरत्वे सामावून घेण्याची कार्यवाही करण्यात यावी.

ii) तथापि, ज्या मंडल कार्यालयाकडे त्यांना नियुक्त केले आहे त्या मंडल कार्यालयाकडे नियुक्तीवेळी अथवा सुधारपत्र क्र. ८६ दि. १८/०९/२०२० निर्गमित होण्यापूर्वी निम्नस्तर लिपीक (लेखा) पदाचा अनुशेष उपलब्ध नसेल तर अशा कनिष्ठ सहाय्यक (लेखा) यांना सामावून घेणे उचित ठरणार नाही. परंतु अशा मंडल कार्यालयाकडे सद्यस्थितीमध्ये अनुशेष उपलब्ध असेल तर अशा कनिष्ठ सहाय्यक (लेखा) यांना सामावून घेण्यात यावे.

iii) तसेच सदर सुधारपत्र निर्गमित होण्यापूर्वी कार्यरत कनिष्ठ सहाय्यक (लेखा) यांचा विचार झाल्यानंतर उर्वरीत पदाकरीता सुधारपत्र क्र. ८६ दि. १८/०९/२०२० अन्वये विचार करुन रिक्त पदे व अनुशेष यांची गणना करण्यात यावी.

iv) वरीलप्रमाणे कार्यवाही करुन देखील काही कनिष्ठ सहाय्यक (लेखा) यांना सामावून घेणे शक्य होत नसल्यास त्यांना संदर्भिय पत्रानुसार प्रादेशिक कार्यालयाच्या कार्यक्षेत्रांतर्गत अन्य परिमंडळांकडे तेथील रिक्त पदे व अनुशेषानुसार वर्ग करण्याबाबत कार्यवाही करावी.

८. सबब, आपले परिमंडळांतर्गत कनिष्ठ सहाय्यक (लेखा) यांच्या समायोजनाबाबतची प्रकरणे प्रलंबित असल्यास त्याबाबत उचित कार्यवाही विनाविलंब करण्यात यावी.

7.7.21

**(भालचंद्र खंडाईत)**
**संचालक (मासं)**

**प्रत रवाना :-**

१) सह व्यवस्थापकीय संचालक (मासं), म.रा.वि.वि.कं.मर्या., प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद/कल्याण.
२) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या., प्रादेशिक कार्यालय, पुणे/नागपूर.
३) मुख्य महाव्यवस्थापक (मासं), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, प्रकाशगड, बांद्रा, मुंबई.
४) महाव्यवस्थापक (मासं), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, प्रकाशगड, बांद्रा, मुंबई.